पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी — ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. ३७ दिनांक ०९/०८/२०२२

# "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अनुषंगाने पालघर पोलीसांकडून "हर घर तिरंगा" रॅलीचे आयोजन

भारताचा ७५ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** या उपक्रमांतर्गत भारताचा राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान वाढविण्यासाठी दि.१३ ऑगस्ट २०२२ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत **"हर घर तिरंगा"** हा कार्यक्रम राबविण्याचे शासनाचे निर्देश झाले आहेत.

त्या अनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे निर्देशान्वये पालघर पोलीस दलातर्फे दि.०८/०८/२०२२ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता चाररस्ता ते हुतात्मा चौक (पाचबत्ती), पालघर असे **"हर घर तिरंगा"** रॅलीचे आयोजन करण्यात आलेले होते.

सदर पदसंचलनात श्री गोविंद बोडके, जिल्हाधिकारी पालघर, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर, श्री शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर यांच्यासह पालघर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच सेंट जॉन महाविद्यालय, सोनोपंत दांडेकर माहाविद्यालय, आनंदाश्रम विद्यालय व ट्विंकल स्टार विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

नमूद पदसंचलनात पोलीस अधिकारी/अंमलदार, शालेय विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते व नागरीक असे एकूण ८०० लोकांनी तिरंगा ध्वजासह उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. सदर पदसंचलन हे चाररस्ता ते हुतात्मा चौक (पाचबत्ती) दरम्यान करण्यात आले असून हुतात्मा चौक येथे पोलीस बँड पथकासह राष्ट्रगीताने पदसंचालनाची सांगता करण्यात आली.